महाराष्ट्र शासन
महसूल व वनविभाग
जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, रायगड-अलिबाग
हिराकोट तळयाजवळ, अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड 402201
❖दूरध्वनी क्र :०२१४१-२२२११८/२२२०९७/२२२३२२ ❖ ❖Email ID : tahasildarmahasul@gmail.com ❖

क्रमांक:मशा/जमीन/अ-०३/कांदळवन तक्रार/१११/२०२३, 4437 दिनांक : ०८/११/२०२३

प्रति,
मा.अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक,
कांदळवन कक्ष,
३०२, फिल्ड हाऊस, तिसरा मजला,
ब्रिटानिया रेस्टॉरंट जवळ, बॅलार्ड इस्टेट,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१.

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष मुंबई
आवक क्र: 2929 दिनांक: 7 NOV 2023
प्रशासकीय अधिकारी अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक

**विषय :- Reclamation of Dastan, Savarkhar, Industrial Waters Complete. (WC-१११)**

संदर्भ :- १) आपलेकडील पत्र जा.क्र./ल.ले/कां.स/ ३६/सन २०२३-२४, दिनांक ०३/०५/२०२३.
२) या कार्यालयाकडील पत्र क्र.मशा/जमीन/अ-०३/कांदळवन तक्रार/२०२३, दिनांक १४/०७/२०२३.

7 NOV 2023

अर्जदार श्री.बी.एन.कुमार यांचा दिनांक २३/०४/२०२३ चा तक्रार अर्ज संदर्भिय क्र.१ कडील पत्रान्वये या कार्यालयास प्राप्त झाला असून, अर्जदार यांनी उक्त अर्जान्वये उरण येथील दस्तान फाटा आणि सावरखार पाणथळ क्षेत्राचे रेक्लमेशन होत असल्याबाबत तक्रार दाखल केली आहे. सदर अर्जाच्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी पनवेल यांनी दिनांक ०३/०७/२०२३ रोजी सादर केलेल्या अहवालाच्या आधारे संदर्भिय क्र.२ कडील पत्रान्वये आपले कार्यालयाकडे अहवाल सादर करण्यात आला आहे.

परंतू, कोकण पाणथळ तक्रार निवारण समितीच्या ४३ व्या बैठकीमध्ये मा.अध्यक्ष, कोकण पाणथळ तक्रार निवारण समिती तथा विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांनी दिलेल्या सुचनांनुसार, रायगड जिल्ह्यातील पाणथळ जमिनीबाबत प्राप्त तक्रारींचे अनुषंगाने संबंधित तक्रारदार, सिडकोचे प्रतिनिधी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे प्रतिनिधी व वन परिक्षेत्र अधिकारी पनवेल/उरण यांचे समवेत दि.१५/०९/२०२३ रोजी संयुक्त स्थळ पाहणी करुन आवश्यक त्या कागदपत्रांसह अहवाल सादर करणेबाबत उपविभागीय अधिकारी पनवेल यांना या कार्यालयाकडील पत्र दिनांक १४/०९/२०२३ अन्वये कळविण्यात आले. त्यानुसार उपविभागीय अधिकारी पनवेल यांनी दिनांक १०/१०/२०२३ च्या पत्रान्वये खालील नमुन्यात अहवाल सादर केला आहे.

**कांदळवन/पाणथळ तक्रारीचा पुर्तता अहवाल**

| अ.क्र. | तक्रारीचा तपशील | कार्यवाहीचा तपशील |
|---|---|---|
| १ | तक्रारदाराचे नांव व दिनांक | श्री.बी.एन.कुमार (WC-१०१) व<br>श्री.बी.एन.कुमार (WC-१११)<br>दि.२३/०४/२०२३. |
| २ | तक्रारीचा विषय | मौजे उरण येथील दस्तान फाटा आणि सावरखार पाणथळ क्षेत्राचे रेक्लमेशन होत असलेबाबत |
| ३ | तक्रारीशी संबधित जागेचा तपशील उदा.स.नं. गावाचे नांव, तालुका | मौजे उरण येथील दस्तान फाटा आणि सावरखार, ता.उरण, जि.रायगड |

| | | |
|---|---|---|
| ४ | चौकशी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नांव व पदनाम | १) उपविभागीय अधिकारी पनवेल<br>२) तहसीलदार उरण<br>३) वन परिक्षेत्र अधिकारी<br>४)श्री.जगदीश पाटील, सिडको<br>५) मंडळ अधिकारी उरण<br>६) जासई तलाठी<br>७) महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे प्रतिनिधी |
| ५ | चौकशीमध्ये आढळून आलेली वस्तुस्थिती | मौजे सावरखार येथील जागेमध्ये डॅक लिलीची झाडे आढळून आली. सदरची जागा करळ उड्डाणपुलाच्या ऊजच्या बाजूला असून, आजरोजी जेएनपीटीच्या ताब्यात आहे. सदरच्या जागेत दोन पाण्याचे तलाव 0.800 हे. आर क्षेत्रात असून त्या जागेत रस्ता केलेला असून त्याची लांबी 500 मीटर आढळून आली, असे तक्रारदार यांनी सांगितले.<br>तथापि, ही जागा पाणथळ असल्याबाबत बोध होत नाही असे सिडकोचे प्रतिनिधी श्री जगदीश पाटील यांनी सांगितले. तसेच ही जागा पाणथळ असल्याबाबत कोणतीही बाब निदर्शनास न आल्याने सदर तक्रारी बाबत समितीने पूढील निर्णय घ्यावा. |
| ६ | कांदळवनाचा /पाणथळाचा ऱ्हास झाला आहे किंवा नाही. | सदरची जमीन अधिसूचित पाणथळ नाही. सबब सदर जागेत पाणथळ जागेचा ऱ्हास झाला आहे. असे म्हणता येणार नाही. |
| ७ | कांदळवनाचा/पाणथळाचा ऱ्हास झाला असल्यास दाखल केलेला गुन्हा क्रमांक, दिनांक व संबधित पोलिस स्थानकाचे नांव | --- |
| ८ | कांदळवनाचा /पाणथळाचा ऱ्हास झाला असल्यास, ज्याच्याविरुध्द गुन्हा दाखल केला आहे त्या व्यक्तींची नांवे व पत्ता. | --- |
| ९ | कोणत्या कायदयाअंतर्गत /कलमा अंतर्गत गुन्हा दाखल केला त्याचे वर्णन | --- |

उपविभागीय अधिकारी पनवेल यांचेकडील चौकशी अहवाल व त्यासमवेतीच्या कागदपत्रांची छायाप्रत माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सोबत जोडली आहेत.

(डॉ.योगेश म्हसे)
**जिल्हाधिकारी रायगड**